**"डिसेंबर २०२०" या महिन्यात सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालयामधील सेवा उपविभागाने घेतलेल्या महत्त्वाच्या निर्णयांची संक्षिप्त माहिती ...**

**(क) शासन निर्णय / अधिसूचना**

- दिनांक १५ डिसेंबर २०२० च्या शासन निर्णयान्वये सामान्य प्रशासन विभाग (खुद्द) मधील भारतीय प्रशासकीय सेवेतील ४ अधिकाऱ्यांना रु.८५,०००/- इतक्या रकमेपर्यंत All in One संगणकासाठी रु.२,४८,८८८/- इतक्या खर्चास मंजुरी देण्यात आली आहे.
- दिनांक १७ डिसेंबर २०२० च्या शासन परिपत्रकान्वये महाराष्ट्र राज्य संवर्गातील भारतीय प्रशासन सेवेतील सर्व अधिकाऱ्यांना त्यांची सन २०२० (As on 1.1.2021) ची वार्षिक अचल मालमत्ता विवरणपत्रे (IPR) Online पद्धतीने सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.
- दिनांक १७ डिसेंबर २०२० च्या शासन निर्णयान्वये अखिल भारतीय सेवा (कार्य मुल्यांकन अहवाल) नियम २००७ प्रमाणे सन २०१९-२० मध्ये नोवेल कोरोना व्हायरसच्या वाढता प्रादुर्भाव लक्षात घेता भारतीय प्रशासन सेवेतील अधिकाऱ्यांनी करुन घ्यावयाच्या वैद्यकिय तपासणीचा अहवाल सादर करण्याची अट शिथिल करण्यात आली आहे.
- दिनांक २१ डिसेंबर २०२० च्या शासन निर्णयान्वये अनुसूचित जमाती प्रवर्गातून नियुक्त झालेल्या तथापि जात वैधता प्रमाणपत्र सादर न करु शकलेल्या महाराष्ट्र लोकसेवा आयोगातील २ अधिकारी / कर्मचारी यांच्यासाठी २ अधिसंख्य पदे निर्माण करण्यात आली आहेत.
- दिनांक २३ डिसेंबर २०२० च्या शासन निर्णयान्वये सामान्य प्रशासन विभाग (खुद्द) साठी कायमस्वरुपी २ वाहने स्टाफ कार म्हणून कायमस्वरुपी भाडयाने घेण्यास मंजुरी देण्यात आली आहे.

**(ख) बदली / मुदतपूर्व बदली / बदलीस स्थगिती / बदली रद्द / पदस्थापनेत बदल / कार्यमुक्त**

- भारतीय प्रशासन सेवेतील १६ अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत.
- उपसचिव-२, सहायक कक्ष अधिकारी-३, निवडश्रेणी लघुलेखक-१, उच्चश्रेणी लघुलेखक-१, लिपिक टंकलेखक-१ अशा ८ अधिकारी / कर्मचाऱ्यांची बदली करण्यात आली आहे.

**(ग) प्रतिनियुक्ती / प्रतिनियुक्तीस मुदतवाढ / प्रत्यावर्तन**

- सहसचिव-१, उपसचिव-१, कक्ष अधिकारी-३ अशा ५ अधिकाऱ्यांना प्रतिनियुक्तीने नियुक्ती देण्यात आली आहे.
- उपसचिव-१, अवर सचिव-२ अशा ३ अधिकाऱ्यांचे प्रत्यावर्तन करण्यात आले आहे.
- एका अवर सचिवाच्या प्रतिनियुक्तीस मुदतवाढ देण्यात आली आहे.

**(घ) ज्येष्ठतासूची**

- दिनांक १५ डिसेंबर २०२० च्या शासन परिपत्रकान्वये सहायक कक्ष अधिकारी पदावरील पदोन्नतीसाठी अर्हताप्राप्त करणाऱ्या मंत्रालयीन विभागातील लिपिक-टंकलेखक संवर्गातील १७४ कर्मचाऱ्यांची दिनांक १ जानेवारी २०२० रोजीची तात्पुरती अतिरिक्त ज्येष्ठतासूची प्रसिद्ध करण्यात आली आहे.

*****